# Tex-Connect

वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन यांचा एक उपक्रम



## या अंकात


| | |
|---|---|
| धोरणाचा आढावा | पृष्ठ 2-3 |
| केंद्रस्थानी असलेले क्षेत्र | पृष्ठ 4 |
| बाजारपेठेचे अंतरंग | पृष्ठ 5 |
| कार्यक्रम आणि घोषणा | पृष्ठ 6 |




"वस्त्रोद्योग विभागाचे 'टेक्स-कनेक्ट' हे त्रैमासिक नियतकालिक सुरू झाल्याची घोषणा करताना मला अतिशय आनंद होत आहे. टेक्स-कनेक्ट हे असे एक माध्यम असेल, ज्याद्वारे विभाग आपल्या अलीकडच्या घडामोडींची माहिती देईल. तसेच या क्षेत्रातील नवनव्या बातम्या, येणारे नवीन प्रवाह, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम यांवर प्रकाश टाकेल.

महाराष्ट्र सध्या वस्त्रोद्योग क्षेत्रामध्ये एका अनोख्या अशा वैशिष्ट्यपूर्ण टप्प्यावर आहे आणि एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ जाहीर झाल्यामुळे, राज्यात वस्त्रोद्योग उत्पादनामध्ये सातत्यपूर्ण वाढ होणे अपेक्षित आहे, यामुळे गुंतवणुकीमध्ये आणि प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारतही वाढ होईल. हे धोरण, भारत सरकारच्या "५ एफ" (फार्म टू फायबर टू फॅक्टरी टू फॅशन टू फॉरेन) या दृष्टीकोनावर आधारित असून त्याचे उद्दिष्ट, आर्थिकदृष्ट्या हित्यवह, परस्पर सुसंवादी आणि वृद्धी-केंद्रित व्यावसायिक वातावरण पुरविणे हे आहे. टेक्स कनेक्टच्या या आवृत्तीमध्ये, धोरणाची वैशिष्ट्ये, बाजारपेठेचे अंतरंग आणि मागील तिमाहीमधील विभागाची उल्लेखनीय कामगिरी ठळकपणे निदर्शनास आणून दिलेली आहे. हे नियतकालिक माझ्याप्रमाणेच तुम्हालाही अभ्यासपूर्ण व माहितीपूर्ण वाटेल अशी मला अशा आहे.

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील**
मा. मंत्री (वस्त्रोद्योग)
महाराष्ट्र राज्य

# धोरणाचा आढावा: एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८

## प्रस्तावना

२ जून २०२३ रोजी जाहीर करण्यात आलेल्या एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ मध्ये पुढील पाच वर्षांसाठी महाराष्ट्रातील वस्त्रोद्योगाची दिशा व उद्दिष्टे निर्धारित केली आहेत.

हे धोरण 'एकात्मिक' आहे, कारण त्यात वस्त्रोद्योग मूल्य साखळीतील जिनिंग आणि प्रेसिंग, सूतकताई, यंत्रमाग, हातमाग, प्रक्रिया, विणकाम, होजिअरी व पोशाकनिर्मिती, रेशीम उत्पादन, पारंपारिक वस्त्रोद्योग, लोकर, अपारंपरिक तंतू, कृत्रिम सूत आणि तांत्रिक वस्त्रोद्योग यांना प्रोत्साहन देऊन, संपूर्ण वस्त्रनिर्माण मूल्यसाखळीचा यात समावेश केलेला आहे.



**प्रसारमाध्यमाना संक्षिप्त माहिती देतांना मा. मंत्री (वस्त्रोद्योग) श्री. चंद्रकांत पाटील आणि सचिव (वस्त्रोद्योग) श्री. विरेंद्र सिंह**

धोरणाचा शाश्वत म्हणून देखील विचार केलेला आहे कारण या धोरणाची अंमलबजावणी करतांना ३ आर म्हणजे कमीवापर, पुनर्वापर आणि पुनर्रचक्रीकरण (रिड्यूस, रियूझ् अँड रीसायकल) या प्रतिमानाच्या आधारे स्वच्छ ऊर्जा व पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर लक्षणीय भर दिलेला आहे.

या धोरणाची अंमलबजावणी करताना, वस्त्रोद्योग विभागाने पुढील ५ वर्षांत कापूस प्रक्रिया क्षमता ३०% वरून ८०% पर्यंत वाढवणे आणि २५,००० कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, ज्यामुळे 5 लाखांपर्यंत कुशल, अर्धकुशल आणि अकुशल कामगारांना रोजगार मिळेल.


रोजगारत वाढ करण्याच्या हेतूने विभाग, कौशल्य विकास व क्षमता बांधणीला चालना देईल. विशेषत: पारंपरिक वस्त्रोद्योगाचे जतन, त्याचा विकास आणि त्याला चालना देण्यासाठी प्रयत्न करेल. महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन देणे तसेच सर्व स्तरावर महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन देऊन वस्त्रोद्योगामध्ये "लिंग समभाव" या विचाराचा मुख्य प्रवाहात समावेश करून घेणे, हा देखील या धोरणाचा उद्देश आहे. या बरोबरच विभाग आपल्या धोरणाची उद्दिष्टे सध्या कारणयाकरीता नियोजन, अंमलबजावणी आणि सनियंत्रण करण्यासाठी संगणकीय प्रणालीचा (सॉफ्टवेअर) उपयोग करेल.

नव्याने जाहीर केलेल्या धोरणावर वस्त्रोद्योग क्षेत्रातील विविध घटकांशी चर्चा करण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला आहे आणि बदल आवश्यक असल्यास अभिप्राय आणि सूचना घेण्यात येत आहेत.

## धोरणांतर्गत विभागणी

वस्त्रोद्योग क्षेत्रातील विकासाची स्थिती आणि संसाधनांची उपलब्धता यांच्या आधारे महाराष्ट्राची ४ झोनमध्ये विभागणी करण्यात आली आहे, ते पुढील प्रमाणे आहेत:

- झोन १: विदर्भ (नागपूर आणि अमरावती विभाग)
- झोन २: मराठवाडा (औरंगाबाद विभाग, धुळे आणि जळगाव जिल्हे)
- झोन ३: उत्तर महाराष्ट्र (धुळे आणि जळगाव जिल्हे वगळता नाशिक विभाग)
- झोन ४: पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण (पुणे आणि कोकण विभाग)




**एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२०२८ अंतर्गत झोन निहाय वर्गीकरण दर्शविणारा महाराष्ट्राचा नकाशा (नकाशा प्रमाणासाठी नाही)**

# धोरणाचा आढावा: एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८

## धोरणातील ठळक वैशिष्ट्ये

धोरणाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

**प्रशासकीय उपाययोजना**

- वस्त्रोद्योग आयुक्तालय आणि रेशीम संचालनालयाचे संबंधित प्रादेशिक कार्यालयांसह विलीनीकरण करून वस्त्रोद्योग आणि रेशीम आयुक्तालयाची निर्मिती करण्यात येईल.
- विद्यमान तीन महामंडळाचे कार्यात्मक विलीनीकरण करून महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग विकास महामंडळ (म.रा.व.वि.म.) हे वैधानिक महामंडळ स्थापन केले जाईल.

**योजना आणि प्रोत्साहने**

- सहकारी घटकांसाठी, आजारी वस्त्रोद्योग घटकांचे पुनर्वसन, ते भाडेपट्ट्याने किंवा भाड्याने देणे आणि अतिरिक्त जमिन विक्रीस परवानगी देणे यासारख्या योजना तयार केल्या जातील.
- सहकारी संस्थांना शासनाने मंजूर केलेल्या प्रकल्प खर्चाच्या ३०% ते ४५% दरम्यान क्षेत्रनिहाय शासकीय भांडवल दिले जाईल.
- खाजगी उद्योगांना क्षेत्रनिहाय एमएसएमईसाठी ३०% ते ४५%, मोठ्या उद्योगांसाठी २५% ते ४०% आणि विशाल उद्योगांसाठी ४०% (जास्तीत जास्त रु. ७५ कोटी, यापैकी जे कमी असेल ते) ते ५५% (जास्तीत जास्त रु. २५० कोटी यापैकी जे कमी असेल ते) भांडवली अनुदानाच्या स्वरूपात आर्थिक सहाय्य दिले जाईल. अल्ट्रा मेगा प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन दिले जाईल.
- राज्य शासन एक नवीन महा-टफ योजना आणत आहे, जी सुतगिरणी आणि यंत्रमाग घटकांच्या पात्र यंत्रसामग्रीवरील क्षेत्रांनुसार, ४०% पर्यंत (किंवा रु. २५ कोटी यापैकी जे कमी असेल ते) भांडवली अनुदान देईल.
- पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी आर्थिक सहाय दिले जाईल. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांसाठी (ई. टी. पी.) ५ कोटी रुपयांपर्यंत, झीरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्पांसाठी (झेड. एल. डी.) १० कोटी रुपयांपर्यंत, सामायिक स्टीम जेनेरेशन प्लांट प्रकल्पांसाठी १ कोटी रुपयांपर्यंत, व पुनर्वापर प्रकल्पांसाठी २ कोटी रुपयांपर्यंत अनुदान दिले जाईल.
- ४ मेगावॅट क्षमतेपर्यंतचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी भांडवली अर्थसाहाय्य दिले जाईल आणि वस्त्रोद्योग घटकांकरीता नेट मीटरिंगवर १ मेगावॅटची कोणतीही मर्यादा नसेल.

## धोरणाच्या अंमलबजावणीची उद्दिष्टे

विभागाने पुढील पाच वर्षांसाठी धोरणाच्या अंमलबजावणीसाठी क्षेत्रनिहाय उद्दिष्टे खालीलप्रमाणे निश्चित केली आहेत:

**वस्त्रोद्योग घटक आणि विणकर**

- नवीन वस्त्रोद्योग घटकांची नोंदणी
- उभारणीखालील घटक कार्यान्वित करणे
- घटकांचे तंत्रज्ञान अद्ययावतीकरण
- अर्बन हाट ची स्थापना
- विकेंद्रीकृत गारमेन्ट घटकांची स्थापना
- प्लग आणि प्ले सुविधायुक्त परिसराची उभारणी
- मुख्य प्रशिक्षक विणकरांची नोंदणी
- तांत्रिक वस्त्रोद्योग संकुलांची स्थापना

**रेशीम**

- नवीन रेशीम अंडीपुंज निर्मिती केंद्र स्थापना
- विद्यमान रेशीम अंडीपुंज निर्मिती केंद्राच्या क्षमतेत वाढ
- मूलभूत रेशीम अंडीपुंज निर्मिती फार्म स्थापना
- तुती रेशीम शेतीचा विस्तार
- टसर रेशीम लाभार्थीमध्ये वाढ
- खुल्या शासकिय रेशीम कोष बाजारपेठेची स्थापना
- कच्च्या रेशीम सुत विनिमय बाजारपेठ स्थापना
- आदर्श रेशीम फार्म/रेशीम प्रशिक्षण केंद्राची स्थापना
- पैठणी विणकर समूह स्थापना
- वाळवण केंद्र आणि गोदामांची स्थापना


**शाश्वतता उपक्रम**

- ई. टी. पी. ची स्थापना
- झेड. एल. डी. ची स्थापना
- सौर प्रकल्पांची स्थापना
- पुनर्वापर प्रकल्पांची स्थापना
- सामूहिक स्टीम जनरेशन प्लांट प्रकल्पांची स्थापना

# बाजारपेठेचे अंतरंग


## आढावा

भारत हा वस्त्रोद्योग आणि पोषाख निर्मितीमधील जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा उत्पादक देश आहे तसेच निर्यात करणारा सहाव्या क्रमांकाचा सर्वात मोठा देश आहे आणि २०२६ पर्यंत संयुक्त वार्षिक अभिरुदधी दर १२% नी वाढने अपेक्षित आहे. एकूण अंदाजित वाढीपैकी पोशाक निर्मिती उद्योगातून तीन चतुर्थांश वाढ अपेक्षित आहे, तर बाजारपेठेच्या आकारमानाच्या उर्वरित एक चतुर्थांश वाद तांत्रिक आणि घरगुती वस्त्रोद्योगाकडून अपेक्षित आहे.




**२०२५-२०२६ पर्यन्त बाजारपेठेतील वस्त्रोद्योग आणि पोषाखनिर्मिती बाजारपेठ क्षेत्राचा विभागनिहाय आकार अंदाज**


वाणिज्यिक माहिती आणि सांख्यिकी महासंचालनालय (डी. जी. सी. आय. व एस.) यांनी वस्त्रोद्योग व पोशाख निर्मिती उद्योगासाठीची प्रकारनिहाय निर्यात आणि आयात माहिती उपलब्ध करून दिली आहे (खाली सचित्र).




**२०२० ते २०२३ मधील वस्त्रोद्योग व पोशाख निर्मिती क्षेत्राच्या प्रकारनिहाय निर्यातीचा कल**

वरील आलेखामध्ये दर्शविल्याप्रमाणे, आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये मागील दोन वर्षांच्या तुलनेत सर्व प्रकारांमध्ये कमी निर्यात झाल्याचे दिसून आले. देशातील कमी झालेले वस्त्रोद्योग उत्पादन, सध्याच्या आर्थिक मंदीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी कमी झाल्याचे द्योतक आहे. तथापि, आर्थिक वर्ष २०२२-२३ मधील निर्यात मात्र २०२० पूर्वीच्या तुलनेत अधिक होती. ज्यावरून हे स्पष्ट होते की, कोविड-१९ महामारीमुळे काही वर्षाच्या टाळेबंदीच्या आव्हानात्मक परिस्थितीवर मात करीत उद्योग पूर्वस्थितिवर येत आहे.

खाली दिलेल्या आलेखामध्ये दर्शविल्याप्रमाणे, दूसरीकडे आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये चांगली कामगिरी करणारे हातमाग आणि गालिचे हे क्षेत्र वगळता, आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये सर्व प्रकरांमधील आयातीमध्ये सातत्याने वाढ झाली आहे.




**२०२२ ते २०२३ दरम्यान वस्त्रोद्योग आणि पोशाखनिर्मिती क्षेत्रातील विभागनिहाय आयातीचा कल**

व्हिएतनाम आणि बांगलादेश यांसारख्या शेजारी देशांनी वस्त्रोद्योग बाजारपेठेचा मोठा भाग काबीज केल्याचा हा परिणाम असू शकतो. तथापि, वाढत्या आयातीमुळे देशांतर्गत वस्त्रोद्योग उत्पादनात सुधारणा होण्यासही चालना मिळू शकते.

## विकासाला चालना देणारे मुख्य घटक

वाढीला चालना देण्यासाठी सर्व प्रकरांमध्ये प्रक्रिया आणि उत्पादनात वाढ होणे आवश्यक आहे. त्या बरोबरच, वस्त्रोद्योग क्षेत्रात संशोधन आणि विकास यावर भर दिल्यास भारताच्या वस्त्रोद्योग क्षेत्राला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत फायदा होईल.

वस्त्रोद्योगाला, इतर गोष्टींबरोबरच उत्पादनातील सर्व प्रक्रियेच्या कार्यक्षमतेतील नावीन्य, सामग्रीचा वापर, रचना आणि उत्पादनात शाश्वततेची आवश्यकता आहे. प्रतिसादात्मक नॅनो तंत्रज्ञान आणि गती संवेदि यंत्रणेचा लाभ घेऊन, ई-वस्त्रोद्योग किंवा अत्याधुनिक वस्त्रोद्योगकेंद्री संशोधन हे या वस्त्रोद्योग क्षेत्रात ज्यांचा फायदा होऊ शकेल अशा मुख्य प्रवाहाचे उदाहरण आहे.

# केंद्रस्थानी असलेले क्षेत्र: तांत्रिक वस्त्रोद्योग

## आढावा

तांत्रिक वस्त्रोद्योगांची, प्रामुख्याने त्यांच्या कार्यात्मक गुणवैशिष्ट्यानुसार, त्यांची वैशिष्ट्ये व वापर यांच्या आधारे १२ प्रकारात वर्गीकरण केले जाते. भारतातील बहुतेक उद्योगांमध्ये ते महत्वाची भूमिका बजावत आहे. २०२० मध्ये प्रकाशित झालेल्या एका अहवालानुसार, भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनामध्ये (जीडीपीमध्ये) तांत्रिक वस्त्रोद्योगाचा वाटा ०.७% इतका आहे आणि भारताच्या एकूण वस्त्रोद्योग आणि पोशाखनिर्मिती बाजारपेठेत जवळजवळ १३% इतके योगदान आहे, ज्यामध्ये बांधणी (पॅकटेक) विभागाचा सर्वात मोठा वाटा आहे. कोविड-१९ महामारीच्या काळात, भारत हा जागतिक स्तरावर पी. पी. ई. संच आणि मुखपट्टि (मास्क) बनविणारा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा उत्पादक देश होता. २०२३ ते २०३० पर्यन्त भारताच्या तांत्रिक वस्त्रोद्योग बाजारपेठेच्या वार्षिक वाढीच्या संयुक्त दरामध्ये (सी. ए. जी. आर.) ४.७% वाढ होण्याची अपेक्षा आहे.



**उच्च दृश्यमानता किंवा प्रतिबिंबीत कपडे/सामग्रीचे संरक्षणात्मक वस्त्रोद्योग किंवा प्रोटेक म्हणून वर्गीकरण केले जाते.**

तांत्रिक वस्त्रोद्योगामधीलण अनेक क्षेत्रे आणि विभाग यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वेगवेगळे प्रयोग होत आहेत, ज्याला महाराष्ट्रात एक उदयोन्मुख उद्योग म्हणून महत्त्वपूर्ण संधी आहे. महाराष्ट्राचे बॉम्बे टेक्सटाईल रिसर्च असोसिएशन (बी. टी. आर. ए.) येथे स्वत:चे जिओटेक सेंटर ऑफ एक्सलन्स देखील आहे.

भारतातील तांत्रिक वस्त्रोद्योगास संपूर्ण पुरवठा साखळी आणि विविधतेसाठीचे सहाय्य यावर पूर्ण लक्ष केंद्रित करणाऱ्या एका मजबूत धोरणाची आणि नियामक सहाय्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र प्रामुख्याने कापूस उत्पादक प्रदेश असल्याने तांत्रिक वस्त्रोद्योगासाठी वापराची अनेक क्षेत्रे आहेत, ज्यात प्रामुख्याने होमटेक, मेडटेक आणि इंडुटेक यासारख्या क्षेत्रांचा समावेश आहे.

## शासकीय उपक्रम

भारत सरकारनेही या क्षेत्राची बाजारपेठेतील क्षमता ओळखली आहे आणि त्याचा विकास वाढवण्यासाठी पुढाकार घेण्यास सुरुवात केली आहे. २०२३-२०२४ च्या त्यांच्या केंद्रीय अर्थसंकल्पात, भारत सरकारने राष्ट्रीय तांत्रिक वस्त्रनिर्माण अभियानाकरिता (एन. टी. टी. एम.) ४५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या अभियानाचे चार प्रमुख घटक आहेत:

- घटक I: संशोधन, नाविन्यता आणि विकास
- घटक II: प्रोत्साहन आणि बाजारपेठ विकास
- घटक III: निर्यात प्रोत्साहन
- घटक IV: शिक्षण, प्रशिक्षण, कौशल्य विकास

आतापर्यंत या अभियानाने २३२ कोटी रुपयांचा ७४ संशोधन प्रकल्पांना मान्यता दिली आहे. भारत सरकारने तरतूद केलेल्या उत्पादन संलग्न प्रोत्साहक योजने मध्ये मानवनिर्मित तंतू आणि १० प्रकारच्या तांत्रिक वस्त्रोद्योग उत्पादनांना प्रोत्साहन देण्याचेही प्रस्तावित आहे, ज्यासाठी सरकारने १०,६८३ कोटी रुपयांचे प्रोत्साहन मंजूर केले आहे.

२०१९ मध्ये, वस्त्रोद्योग मंत्रालयाने तांत्रिक वस्त्रोद्योगासाठी २०७ सुसंगत नामांकन प्रणाली (एच. एस. एन.) संकेतांक प्रदान केले आहेत.

## धोरणामधून

या धोरणात तांत्रिक वस्त्रोद्योग क्षेत्रावर लक्षणीय भर देण्यात आला असून राज्यात सहा (६) तांत्रिक वस्त्रोद्योग संकुले स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे. याव्यतिरिक्त, तांत्रिक वस्त्रोद्योग क्षेत्राची सातत्यपूर्ण वाढ सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र तांत्रिक वस्त्रोद्योग अभियान सुरू करण्यात येईल. या उदयोन्मुख तंत्रज्ञानातील संशोधन आणि विकासाला चालना मिळावी यासाठी दरवर्षी ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

# कार्यक्रम

## वस्त्रोद्योग घटकांच्या प्रतिनिधींशी चर्चा

मा. मंत्री (वस्त्रोद्योग) श्री. चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली २७ जून २०२३ रोजी महाराष्ट्रातील सूतगिरणी, यंत्रमाग आणि हातमाग उद्योगांच्या प्रतिनिधींसमवेत मंत्रालयात बैठक पार पडली.

एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरणाच्या वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकून उद्योगाला यातून कसा लाभ मिळणे अपेक्षित आहे हे ठळकपणे निदर्शनास आणून देणे हा या चर्चेचा हेतु होता. यावेळी धोरणाच्या अंमलबजावणीबाबतच्या सूचना आणि मागील धोरणासंबंधात नवीन धोरणाच्या वैशिष्ट्यांबाबतच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. वस्त्रोद्योग घटकांच्या प्रतिनिधींनी मा. मंत्र्यांसोबत सध्याच्या



**मा. वस्त्रोद्योग मंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हितधारकांची चर्चा झाली.**

समस्यांबाबत विशेषतः वीज, अनुदान, कच्च्या मालाच्या किंमती, आणि निधीची उपलब्धता यांविषयी चर्चा केली.

# घोषणा

## वस्त्रोद्योग विभागाच्या नवीन संकेतस्थळाचा शुभारंभ

महाराष्ट्र शासन वस्त्रोद्योग विभागाने https://mahatextile.maharashtra.gov.in/ हे नवीन संकेतस्थळ निर्माण केले आहे. संकेतस्थळास भेट देणाऱ्याना सुधारित आंतरपृष्ठ, वापरकर्ता-स्नेही दिशादर्शन आणि द्विभाषिक आशय याद्वारे सामान्यतः वस्त्रोद्योग विभाग आणि वस्त्रोद्योग क्षेत्रात येणारे नवीन प्रवाह, बातम्या आणि नवीन घडामोडींची अद्ययावत माहिती मिळण्यास मदत व्हावी, हा या नवीन संकेतस्थळाचा उद्देश आहे. नवीन संकेतस्थळ या महिन्यात सुरू करण्यात येईल.

## आपले सरकार या पोर्टलवर रेशीम उत्पादन सेवा उपलब्ध

सेवा हक्क अधिनियमाचा भाग म्हणून, विभागाने, रेशीम उत्पादक शेतकऱ्यांची नोंदणी, चौकी केंद्रांची नोंदणी, रीलर्सची नोंदणी आणि रेशीम उत्पादक शेतकरी/लाभार्थ्यांना तांत्रिक मार्गदर्शन, या चार सेवा अधिसूचित केलेल्या आहेत, त्या आता महाराष्ट्र शासनाच्या आपले सरकार पोर्टलवर ऑनलाइन उपलब्ध करण्यात येणार आहे.

### संपर्क साधा

श्रीकृष्ण बाबूराव पवार, उपसचिव (वस्त्रोद्योग)
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (स. प. व व. वि.)
महाराष्ट्र शासन

कार्यालयीन दूरध्वनी क्रमांकाचा: ०२२-२२०२५१५९
ईमेल: shrikrishna.pawar@nic.in

अस्वीकरण: नियतकालिकात दिलेल्या माहितीची अचूकता आणि विश्वासार्हता यांची खात्री करण्यासाठी सर्व प्रयत्न केले असले तरी, त्याची पूर्णता किंवा समयोचितता याची हमी दिली जाऊ शकत नाही. दिलेल्या आशयाचा हेतु हा केवळ सर्वसाधारण माहिती देण्याचा आहे आणि तो कायदेशीर, आर्थिक किंवा व्यावसायिक सल्ला म्हणून विचारात घेण्यात येऊ नये. पुरविण्यात आलेला आशय हा माहितीच्या प्रयोजनसाठी आहे आणि स्पष्टपणे निर्देशिल्याशिवाय कोणतेही विशिष्ट उत्पादन, सेवा किंवा संस्थेचे समर्थन किंवा प्रचार म्हणून याचा अन्वयार्थ लावण्यात येऊ नये. या नियतकालिकात बाह्य संकेतस्थळ, दस्तऐवज किंवा संसाधनांचे दुवे (हायपरलिंक) किंवा संदर्भ यांचा समावेश असू शकतो. आशय, अचूकता किंवा बाह्य स्रोतांची उपलब्धता या बाबींवर विभागाचे नियंत्रण नाही.